# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ११९) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.०३ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## रेवन्ना प्रकरणी प्रधानमंत्र्यांनी त्या पीडित महिलांची माफी मागावी; राहुल गांधींची मागणी

शिवमोग्गा दि.२ (वृत्तसंस्था)- अनेक महिलांचं शोषण केल्यानं आणि याचे हजारो व्हिडिओ लीक झाल्यानं प्रज्वल रेवन्ना हे नाव सध्या देशभरात चर्चेत आलं आहे. प्रज्वल रेवन्ना हे माजी पंतप्रधान एचडी देवैगौडा यांचे नातू असून सध्या जेडीएसचे खासदार आहेत. पण यंदा रेवन्ना पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात असून प्रधानमंत्री मोदींनी स्वतः यांचा प्रचार केला होता. त्यामुळं आता भाजप आणि मोदी देखील अडचणीत आले आहेत. यापार्श्वभूमीवर राहुल गांधींनी मोदींना टार्गेट केलं आहे.

राहुल गांधी प्रचारानिमित्त सध्या कर्नाटकातील शिवमोग्गा इथं आले होते. यावेळी त्यांना प्रज्वल रेवन्नाबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना राहुल गांधी म्हणाले, या ठिकाणी सर्वात मोठा इश्यू हा आहे की इथं जी रेवन्ना केस आहे. या रेवन्नानं मोठ्या प्रमाणावर महिलांवर अत्याचार केले आहेत, ४०० महिलांवर त्यानं अत्याचार केले आहेत. या व्यक्तीचा प्रधानमंत्र्यांनी प्रचार केला आहे. याचं उत्तर आणि त्या पीडित महिलांची माफी प्रधानमंत्र्यांनी मागितली पाहिजे.

## भारत जोडो यात्रेचा समारोप ४ जूनला काँग्रेस ढूंढो यात्रेने होईल; अमित शाह यांचा घणाघात

बरेली दि.२ (वृत्तसंस्था)- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला आहे. पक्षाचे राजपुत्र राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेने निवडणूक प्रचाराची सुरुवात केली होती, परंतु त्याचा समारोप हा येत्या ४ जून रोजी काँग्रेस ढूंढो यात्रेने होईल असं म्हणत टीकास्त्र सोडलं आहे. बरेलीमधून भाजपाचे उमेदवार छत्रपाल गंगवार यांच्या समर्थनार्थ आयोजित जाहीर सभेला संबोधित करताना अमित शाह यांनी असं म्हटलं आहे.



''आमच्यासमोर ही घमंडीया आघाडी निवडणूक लढवत आहे. त्यांचे राजपुत्र राहुलबाबा यांनी भारत जोडो यात्रेने निवडणुकीची सुरुवात केली. पण आज मी बरेलीला सांगून जात आहे की त्यांची सुरुवात भारत जोडो यात्रेने झाली होती पण ४ जूननंतर तिचा काँग्रेस ढूंढो यात्रेने समारोप होणार आहे. दोन टप्प्यातील निवडणुकीत काँग्रेस दुर्बिणीतूनही दिसत नाही आणि नरेंद्र मोदी शतक ठोकून ४०० च्या शर्यतीत खूप पुढे गेले आहेत'' असा दावा अमित शाह यांनी केला आहे.

''ही निवडणूक नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवणार आहे. ही निवडणूक आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याची निवडणूक आहे. ही निवडणूक म्हणजे तीन कोटी लखपती दीदी निर्माण करण्याची निवडणूक आहे. ही निवडणूक दहशतवाद आणि नक्षलवाद संपवण्याची निवडणूक आहे'' असंही म्हटलं आहे.

अयोध्येत राम मंदिर उभारणीचा संदर्भ देत गृहमंत्र्यांनी या मुद्द्यावरून काँग्रेसवरही टीका केली. त्यांनी आरोप केला की, ''७० वर्षांपासून काँग्रेस पक्ष राम मंदिराचा मुद्दा रखडवत होतं, पुढे ढकलत होतं. तुम्ही नरेंद्र मोदींना दुसऱ्यांदा पंतप्रधान केलं, त्यानंतर पाच वर्षांतच मोदींनी केस जिंकली, भूमिपूजन केलं आणि २२ जानेवारीला प्राणप्रतिष्ठा करून जय श्री रामचा जयघोष केला.''

### ब्रिजभूषण यांचे तिकीट कापले

गोंडा दि.२ (प्रतिनिधी)- महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाचा आरोप असलेल्या ब्रिजभूषण शरण सिंह यांचे भाजपने तिकीट रद्द केले आहे. मात्र, त्यांचा धाकटा मुलगा करण भूषण यांना भाजपने त्यांच्या कैसरगंज मतदारसंघातून तिकीट दिले आहे. भाजपने गुरुवारी संध्याकाळी ही घोषणा केली. करण भूषण हे यूपी रेसलिंग असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. ते भारतीय कुस्ती संघटनेचे उपाध्यक्ष राहिले आहेत, परंतु त्यांच्या वडिलांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी हे पदही सोडले. कैसरगंजमध्ये ३ मे ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. करण शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. करण सिंह यांचे प्रतिनिधी जगन्नाथ तिवारी यांनी गुरुवारी कैसरगंजमधून नामनिर्देशनपत्रांचे ४ संच खरेदी केले.

## मोदींचा देशाचे संविधान बदलण्याचा डाव, छत्रपती संभाजीराजे यांचा घणाघात

कोल्हापूर दि.२ (प्रतिनिधी)- केंद्रातील सत्ताधारी भाजपने ४०० पारची दिलेली हाक म्हणजे देशाचे संविधान बदलण्याचा डाव आहे, असा घणाघात छत्रपती संभाजीराजे यांनी कोल्हापुरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधताना केला आहे. काहीजण छत्रपती घराण्यावर टीका करत आहेत. यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यवीर छत्रपती संभाजी महाराज, ताराबाई राणी साहेब, छत्रपती शाहू महाराज यांच्यावरही टीका झाली. या टीकेमुळे त्यांना फरक पडत नसेल, पण मला पडतो, असा इशाराही त्यांनी यावेळी विरोधकांना दिला.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने छत्रपती शाहू महाराजांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या प्रचारार्थ कोल्हापुरात शिवशाहू निर्धार सभा झाली. या सभेत बोलताना छत्रपती संभाजीराजे यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला. भाजपचा ४०० पारचा नारा म्हणजे धोक्याची घंटा आहे. त्यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलायचे आहे, असे ते म्हणाले.

संभाजीराजे पुढे बोलताना म्हणाले की, ४०० पारच्या नाऱ्यावर तुम्ही कधी विचार केला आहे का? ४०० पार म्हणजे धोक्याची घंटा. त्यांना एकहाती सत्ता हवी असेल तर ते २७२ का म्हणत नाहीत. संसदेत एकूण सदस्य ५४३ आहेत. त्याचे निम्मे २७२ होतात. तुम्हाला २७२ म्हणणे अवघड वाटत असेल, तर ३०० म्हणा. पण चारशेच का? ४०० पार म्हणजे त्यांना संविधान बदलायचे आहे. त्यांना कायदा दुरुस्ती नाही, तर कायदाच बदलायचा आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान आपल्याला दिले आहे, ते मोडून काढायचे आहे. त्यासाठी त्यांना ४०० हून जास्त जागा हव्या आहेत. ही ऐतिहासिक व दिशादर्शक निवडणूक आहे. त्यामुळे सर्वांनी सावध राहण्याची गरज आहे, असे संभाजीराजे म्हणाले.

## एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर उद्धव ठाकरेंकडून मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर, देवेंद्र फडणवीसांचा गौप्यस्फोट

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदेच्या बंडानंतर मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर असल्याचा गौप्यस्फोट केला आहे. एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांना हा गौप्यस्फोट केला आहे. एकनाथ शिंदेच्या बंडानंतर उद्धव ठाकरेंनी मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली होती. तुम्ही मुख्यमंत्री बना असा उद्धव ठाकरेंचा फोन आल्याचा सनसनाटी गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर मला उद्धव ठाकरेंनी फोन केला. तुम्ही मुख्यमंत्री बना, असे म्हणत मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली. मात्र वेळ निघून गेली होती. २०२२ सालाच्या सत्ता स्थापनेच्या वेळी तुम्ही मुख्यमंत्री बना असे सांगितले. आम्ही एकनाथ शिंदेसोबत एकत्र येत आहोत हे चित्र जेव्हा स्पष्ट झाले. त्यादिवशी सकाळी मला उद्धव ठाकरेंचा फोन आला. ते म्हणाले, देवेंद्रजी तुम्ही कशाला त्यांना सोबत घेता किंवा त्यांना एखादे पद देता? मी संपूर्ण पार्टी घेऊन येतो. तुम्ही मुख्यमंत्री बना आपण हे सगळे नीट करु.

## माझ्यावर व उद्धव ठाकरेंवर टीका केल्याविना मोदींना स्वस्थता वाटत नाही-शरद पवार

सांगली दि.२ (प्रतिनिधी)- देश विकासासाठी सर्वच पंतप्रधानांनी काम केले आहे, मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रात आल्यावर माझ्यावर आणि उद्धव ठाकरेंवर टीका केल्याविना स्वस्थता वाटत नसावी अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते खासदार शरद पवार यांनी गुरुवारी तासगावमध्ये झालेल्या सभेत केली.

महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ आज तासगावमध्ये महाविकास आघाडीची प्रचार सभा पार पडली. यावेळी पवार बोलत होते. यावेळी शिवसेनेचे खासदार संजय राऊत, प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, आमदार सुमनताई पाटील, आमदार अरुण लाड, नितीन बानुगडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान होत्या, राज्यांमधल्या अनेक भागात त्या जात असत. देशातल्या गरीब लोकांची गरिबी कशी घालवायची हा विचार मांडत असत. देशातल्या सगळ्याच पंतप्रधानांनी हे काम केलं आहे. आत्ताचे पंतप्रधान (नरेंद्र मोदी) महाराष्ट्रात येतात. महाराष्ट्रात आले की त्यांना दोन लोकांची आठवण होते. एक उद्धव ठाकरे दुसरे शरद पवार.



आम्हा दोघांवर टीका केल्याशिवाय त्यांना स्वस्थ बसवत नाही. पैलवान पाटील यांनी कुस्ती क्षेत्रात डबल महाराष्ट्र केसरी किताब दोन वेळा पटकावून नाव कमावले आहे. कुस्तीप्रमाणेच संसदेतही ते चांगले काम करतील.

चंद्रहार पाटील यांची उमेदवारी आम्हाला टीव्हीवरच कळाली. याबाबत चर्चा झाली नाही, असं शरद पवार यांनी म्हटलंय. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेने सांगलीच्या उमेदवारी बाबत गडबड केली की काय? असा प्रश्न उपस्थित होतोय. महाविकास आघाडीमधील काँग्रेस आणि शिवसेना या दोन पक्षांमध्ये सांगलीचे उमेदवारीवरून आधीच बराच काथ्याकूट झाला असताना आता तर शरद पवारांनी सांगलीचे उमेदवारी आम्हाला देखील टीव्हीवरुन समजली. आमच्यात उमेदवारी चर्चा झाली नव्हती, असं सांगितल्याने सांगलीची उमेदवारीच्या जाहीर होण्याबाबतचा गुंता अधिकच वाढलाय.

## उद्धव ठाकरेंकडे शिव्या आणि टोमणे मारण्याचे काम शिल्लक; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा निशाणा

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे सध्या आम्हाला शिव्या दिल्याशिवाय दुसरे काम नाही. आम्ही त्यांच्या टोमण्यावर लक्ष देत नाही. आम्ही काम करणारे लोक आहोत, त्यामुळे आम्ही आमच्या कामावर लक्ष केंद्रित करत आहे. आता त्यांना काम उरलेले नाही. त्यामुळे आता टोमणे मारण्या व्यतिरीक्त त्यांच्याकडे काम शिल्लक नाही. सत्तांतर झाले आहे हे अजूनही त्यांच्या पचणी पडलेले नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे असे प्रकार करत असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात मुख्यमंत्र्याच्या रॅलीदरम्यान मशाल पेटवण्यात आली होती. यावरुन मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरेवर टीका केली आहे.

मागील ५० ते ६० वर्षात काँग्रेसला जे करता आले नाही, ती सर्व विकासाची कामे मोदींनी दहा वर्षात करून दाखवली आहे. या देशाला विकासाच्या मार्गावर नेण्याचे काम मोदींनी केले आहे. तसेच राज्यात महायुतीने देखील मागच्या दोन वर्षात केलेला विकास, घेतलेले निर्णय या सर्वांची पोच पावती या निवडणुकीमध्ये नाशिक तसेच दिंडोरीकर उमेदवारांच्या विजयाच्या रूपाने देतील, असा विश्वास (पान ४ वर)

## हेमंत गोडसे, डॉ.भारती पवारांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

### नाशिकमध्ये महायुतीचे जोरदार शक्तीप्रदर्शन

नाशिक दि.२ (प्रतिनिधी)- गेल्या महिन्याभरापासून महायुतीत रखडलेला नाशिकचा तिढा अखेर काल सुटला. शिवसेना शिंदे गटाकडून हेमंत गोडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. हेमंत गोडसे हे सलग तिसऱ्यांदा नाशिकमधून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून भाजपने विद्यमान खासदार डॉ. भारती पवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

शिवसेनेच्या हेमंत गोडसेंना उमेदवारी जाहीर होताच त्यांच्याकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात येत आहे. इगतपुरी तालुक्यातील घाटनदेवीपासून नाशिक शहराकडे वाहनांची महाविजय रॅली काढण्यात आली आहे. या रॅलीला शिवसैनिक आणि गोडसे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाशिक लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी नाशिकमध्ये महायुतीकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्यासह (पान ४ वर)

## आचारसंहिता लागल्याने शिवरायांची वाघनखे आणण्यास विलंब, सुधीर मुनगंटीवारांची माहिती

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- आचारसंहिता लागल्याने छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखं ब्रिटनकडून भारतात येण्यास विलंब होत असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. ४ मे रोजी महाराष्ट्रात वाघनखं आणण्यात येणार होते. मात्र मुनगंटीवार यांनी शिवरायांच्या वाघनखा आणण्यास विलंब का होतोय यामागचे कारण सांगितले आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलतांना, सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, वाघनखं येण्याबाबत आम्ही ४ मे तारीख निश्चित केली होती. त्यादृष्टीने सर्व पत्रव्यवहार झाला. ४ मेला येण्याबाबत मंजुरी लिखित देण्यात आली. पण जेव्हा आचारसंहिता लागली तेव्हा त्यांनी आमच्याशी चर्चा केली. आचारसंहितामध्ये आणण्यामध्ये आमच्याही अडचणी होत्या. निवडणूक आयोगाकडे काँग्रेस किंवा इतर पक्षांनी तक्रारी केल्या असत्या. निवडणूका बघून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत भावनिक मतदारांना आव्हान केले जात आहे असा आरोप केला गेला असता. पण छत्रपती छत्रपती आहेत. शिवबा हृदयात पाहिजे, असे मुनगंटीवार म्हणाले.

## मतदानाची टक्केवारी अचानक कशी वाढली?, संजय राऊत यांनी व्यक्त केली शंका

सांगली दि.२ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या २ टप्प्यांतील मतदानाच्या टक्केवारीत ११ दिवसांनी अचानक वाढ झाली. त्यामुळे निवडणूक आयोगावर कसा विश्वास ठेवायचा, असा सवाल शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. मोदी-शहांच्या पकडीमध्ये निवडणूक आयोग गुदमरल्याचा आरोप करत देवेंद्र फडणवीस लवंगी फटाका इतकाही स्फोट करू शकत नाहीत, असा टोलाही त्यांनी यावेळी हाणला. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर उद्धव ठाकरे यांनी मला मुख्यमंत्रीपदाची ऑफरही दिली होती, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर राऊत आज सांगलीत बोलत होते.

याशिवाय राऊतांनी पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांच्या पकडीमध्ये गुदमरलेला आहे अशी टीका केली आहे. ते म्हणाले, अत्यंत महत्त्वाचा गंभीर विषय या निवडणुकीतला काल समोर आला आहे. भारताच्या निवडणूक आयोगावर किती विश्वास ठेवायचा? या देशाचा निवडणूक आयोग हा मोदी-शहांच्या पकडीमध्ये गुदमरलेला आहे. ईव्हीएम, आचारसंहितेची प्रकरणे असतील, कारवाई असेल, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर निवडणूक आयोगाने दिलेले निर्णय असतील. त्यात आता अजून एक भर पडली आहे, ती म्हणजे साधारण ६ ते ७ टक्के मतं अचानक वाढल्याचे दाखवले (पान ४ वर)

## शरद पवारांना मी कधी सोडले नाही, त्यांची भूमिका वारंवार बदलली-अजित पवार

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- माझा स्वभाव एक घाव दोन तुकडे असा आहे. उगीच कोणाला हेलपाटे मारण्यास आवडत नाही. त्यामुळे मी राजकारणात कधी येईल असे वाटले नव्हते. मात्र, मतदारांचे प्रेमामुळे मी राजकारणात आलो व टिकलो. आज विकासासाठी आम्ही वेगळी वाट निवडली आहे.

ही भावकीची निवडणूक नाही. अनेकजण मला म्हणतात, या वयात मी साहेबांना सोडवयाला नको होते. परंतु मी साहेबांना कधी सोडले नाही. अनेक वर्ष मी साहेबांसोबत काम केलेले आहे त्यांची वारंवार बदलती भूमिका बघतली आहे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूर येथे सुनेत्रा पवार यांचे प्रचारार्थ जाहीर सभेत व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, दत्ता भरणे उपस्थित होते.

अजित पवार पवार म्हणाले, सर्व संस्था, कारखाने, लोक साहेब यांच्यासोबत राहतील प्रयत्न केला. सोनिया गांधी या परदेशी व्यक्ती असल्याने त्यांना पाठिंबा नसल्याने पवार साहेब यांनी (पान ४ वर)

## सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनमध्ये महिलांसाठी आरक्षण लागू

### अध्यक्षपदाबाबतही खंडपीठाकडून महत्त्वाचे निर्देश

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (२ मे) आगामी निवडणुकांसह (२०२४-२५) सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन पदांमध्ये किमान एक तृतीयांश महिला आरक्षण लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. २०२४-२५ च्या आगामी निवडणुकीत एससीबीएचे अध्यक्षपद एका महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

''२०२४-२५ च्या आगामी निवडणुकीत सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. या आरक्षणामुळे पात्र महिला सदस्यांना इतर पदांसाठी निवडणूक लढवण्यापासून रोखता येणार नाही, असेही खंडपीठाने म्हटलं. एससीबीएच्या पदाधिकाऱ्यांचे एक पद रोटेशनच्या आधारे केवळ महिलांसाठी राखीव ठेवण्यात यावे'', असे निर्देश न्यायालयाने दिले.

न्यायालयाने निर्देश दिले की च्या कनिष्ठ कार्यकारी समिती (९ पैकी ३) आणि वरिष्ठ कार्यकारी समिती (६ पैकी २) मध्ये महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षण असेल. २०२४-२५ या कालावधीसाठी अध्यक्षपद एका महिला उमेदवारासाठी राखीव ठेवण्याच्या न्यायालयाच्या निर्देशाला काही वकिलांनी आक्षेप घेतला. त्यांनी हे पद आणखी काही कालावधीसाठी राखीव ठेवण्याची सूचना केली. मात्र, खंडपीठाने आपली भूमिका बदलली नाही.

## इटलीच्या सुनेला स्वीकारले पण शरद पवारांनी स्वत:च्या बारामतीच्या सुनेला स्वीकारले नाही

### भाजप प्रवक्त्या शायना एन.सी यांचा टोला

पुणे दि.२ (प्रतिनिधी)- बारामती मध्ये सुनेत्रा पवार या सक्षम उमेदवार असून त्यांनी वेगवेगळया क्षेत्रात यशस्वी काम केले आहे. त्यांना राजकारणात येण्याचा अधिकार आहे. कामाच्या आधारावर महिलांनी राजकारणात आले पाहिजे. सुप्रिया सुळे यांनी ट्रिपल तलाक यास संसदेत विरोध केला आहे. त्या कोणत्यातरी राजकीय व्यक्तीच्या मुलगी आहे म्हणून त्यांना तिकीट दिले जात आहे. इटलीच्या सुनेला स्वीकार केले पण शरद पवार यांनी स्वतःच्या बारामतीच्या सुनेला स्वीकारले नाही. त्यामुळे महिला सन्मान बाबत बोलणाऱ्यानी महिलेचा राजकारणात अपमान केला आहे असे मत भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन.सी यांनी गुरवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

भाजपचे माजी गटनेते गणेश बिडकर, भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर, एनसीपी प्रवक्ते प्रदीप देशमुख, लोकसेवा जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष संजय अल्हाट, शिवसेनेचे पदाधिकारी निलेश गिरमे, शैलेश चव्हाण, निवेदिता एकबोटे, पुष्कर तुळजापूरकर उपस्थित होते.

शायना एन.सी यांनी मोदी सरकारचे महिलांबाबतचे धोरण व योजना आणि राजकीय सद्यस्थिती या विषयावर माहिती देताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महिला विषयाबाबत संवेदनशील आहे. महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रात कौशल्य मिळावे यासाठी विविध योजना कार्यरत करण्यात आल्या आहे. देशात १०६ वेळा घटना दुरुस्ती झाली पण मोदी यांनी घटना दुरुस्ती महिला सक्षमीकरण, महिला आरक्षण याबाबत केली आहे. त्यामुळे जे गैरप्रचार करतात त्यांनी विविध विकास कामांची माहिती घ्यावी.

# तीव्र उन्हाचा चटका अर्थकारणालाही!

यावर्षी जाणवणाऱ्या तीव्र उन्हाळ्याचा मोठा आर्थिक फटका शेतीला आणि दैनंदिन व्यवहाराला बसत आहे. वीज कपातीला तोंड द्यावं लागत आहे. वीज नसल्यामुळे कारखाने चालत नाहीत, त्यामुळे उत्पादकता कमी होते. परिणामी उत्पादनांच्या किमती अनाठायी वाढणार आहेत किंवा त्या वस्तूंच्या विक्रीतून कंपन्यांना होणारा फायदा घटणार आहे. यामुळे त्यांच्या एकूणच आर्थिक नियोजनाला मोठा फटका बसणार आहे.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सध्या एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे दोन्ही देश कडक उन्हाळ्याच्या फटक्याने अक्षरशः बेजार झाले आहेत. त्यातच भारतातल्या अनेक भागांमध्ये सध्या विजेचं संकट निर्माण झालं आहे. कोळसा उपलब्ध नसणं आणि त्याच्या नियोजन-वितरणातला दोष, राज्य सरकारचा गलथानपणा यामुळे हे संकट तीव्र बनलं आहे. विशेषतः उत्तर भारतामध्ये आणि महाराष्ट्राच्या काही भागात 'पॉवर कट'ची परिस्थिती असल्यामुळे हा उन्हाळा अधिक दुष्कर वाटायला लागला आहे. एकूणच उन्हाळ्याच्या दिवसात प्रचंड उन्हाळा, पावसाळ्यात प्रचंड पाऊस, तर हिवाळ्यात कडक थंडी अशा प्रकारच्या वातावरणाला आपल्याला सामोरं जावं लागत आहे. ही पर्यावरणीय विषमता, उद्योगधंदे, शेती व्यवसाय आणि आरोग्य यासाठी हानिकारक आहे.

एकीकडे वीज उपलब्ध नसताना दुसरीकडे विजेची मागणी प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसते. परिणामी, भारताच्या बहुतांश कानाकोपर्‍यांमध्ये सध्या चाळीस ते पंचेचाळीस डिग्री सेल्सिअस इतकं प्रचंड तापमान अनुभवायला मिळत आहे. यातलं वैशिष्ट्य म्हणजे पारा मार्च महिन्यामध्येच ४० च्या वर गेला. हिवाळा ते उन्हाळा असं संथ संक्रमण आपल्याला यंदा पाहायला मिळालं नाही. पडदा पडावा तसा हिवाळा खटकन संपला आणि दुसऱ्या दिवशी कडक उन्हाळा सुरू झाला. वातावरण बदलाचं हे एक नवीन चित्र आपल्या डोळ्यांसमोर आहे. तापमान प्र्रचंड वाढलं की, आपल्याकडे पाऊस पडतो आणि जमीन आणि हवामान थंड होतं. परंतु सध्या भारतात कुठेही ढग जमलेत असं दिसत नाही. त्यामुळे सूर्याची उष्णता थेट जमिनीवर आणि जनमानसावर पडत आहे. त्यामुळे जीणं अतिशय दुष्कर होऊन गेलं आहे. त्याचा परिणाम म्हणून ओरिसामध्ये शाळा बंद करण्यात आल्या. पश्चिम बंगालमध्येदेखील काही ठिकाणी अशीच परिस्थिती निर्माण झाली. या सगळ्यांचा परिणाम सर्वांच्या तब्बेतीवर व्हायला लागला आहे. त्याचा परिणाम उत्पादन क्षमतेवर देखील झालेला दिसतो.

इतकं दाहक भीषण असं चित्र आता हवामानाच्या बाबतीत आपल्याकडे घडतंय. लक्षात घ्या, याच काळामध्ये पावसाळ्यापूर्वी जमीन तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना उन्हातान्हात अक्षरशः ४०-४५ डिग्रीमध्ये तासनतास राबावं लागतं. त्याच उन्हाच्या कडाक्यात अनेक शेतकऱ्यांच्या तब्बेती बिघडतात. अतिसार आणि निर्जलीकरण अशा व्याधींना बळी पडावं लागण्याचा हाच काळ. या काळात आणखी एक गोष्ट बहुतांशी वेळा खेडेगावात, जंगलात दिसते, ती म्हणजे जंगलामध्ये आगी लागण्याचं प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढतं. हे सगळं अचानक घडतंय का? तर त्याचं उत्तर 'नाही' असं आहे. वातावरण बदलाचे किंवा जागतिक तापमानवाढीचे अहवाल काढून बघा, त्या प्रत्येक अहवालात हा धोका वर्तवण्यात आला होता. दर वर्षी आपण तापमानवाढीचे उच्चांक पाहतोय. कधी १२० वर्षांमधला सर्वात कडक उन्हाळा, तर कधी शंभर वर्षांमधला सर्वात भीषण पाऊस, तर कधी ८० वर्षांमधली सर्वात जोरदार थंडी या सर्वाला आपण तोंड देतोय. सध्या आपण अनुभवत असलेल्या उन्हाळ्याची तीव्रता गेले सहा आठवडे कमी झाली नाही. ज्याला आपण उष्णतेच्या लाटा म्हणतो, ती परिस्थिती आपल्याकडे सर्वसाधारणपणे मे महिन्याच्या सुरुवातीला येईल असं जाहीर केलं गेलं होतं. परंतु यावेळी मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातच उष्णतेच्या अशा लाटा आल्या. या सगळ्यांवरून पर्यावरण बदलाची तीव्रता आपल्या लक्षात येईल.

एकूणच हवामानाचा एक पॅटर्न ठरलेला आहे. समुद्राचं गरम पाणी पॅसिफीकमधून भारताकडे यायला सुरुवात होते. त्यातून गरम वाऱ्यांच्या दिशा या भारताकडे येतात. गरम वाऱ्यांमुळे संपूर्ण देशभर एक गर्मीचं वातावरण निर्माण होत असतं. हा काहीसा तांत्रिक विषय. परंतु हे सर्व आपल्या जीवनाशी, जीवन व्यवहाराशी आणि अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. पर्यावरण बदलामुळे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम लक्षणीय आहेत. पर्यावरण बदलामुळे होणाऱ्या तापमानवाढीचा परिणाम जनावरांबरोबरच मनुष्यावरही होतो. या सगळ्याला इंग्रजीत डिहायड्रेशन (निर्जलीकरण) असं म्हणतात. त्याचा त्रास खूप मोठ्या प्रमाणावर व्हायला लागतो. म्हणजे घाम येतो पण तो सुकत नाही. त्यामुळे आणखी भीषण परिस्थिती उद्भवते. गेले काही दिवस मी अमरावती, अचलपूर, नागपूर या भागांत एका शोध समितीचा प्रमुख म्हणून काम करत होतो. यापूर्वी देखील ऐन उन्हाळ्यात मी विदर्भात आलो आहे. पण यावेळी काही तरी वेगळं होतं. असं जाणवलं की, रात्रीचं तापमानदेखील थंड होत नाही. त्यामुळे शरीराचं आणि जमिनीचं तापमानही कमी होताना दिसत नाही. जमिनीचं तापमान दिवसा जसं असतं तसंच रात्रीदेखील जाणवतं. त्यामुळे दिवसा त्याची तीव्रता वाढलेली असते. रात्री जमीन थंडच होत नाही. या सगळ्याशी आपला जीवन व्यवहार जुळवून कसा घ्यायचा हा खरा सवाल आहे. त्याच्या प्रशिक्षणाची गरज आहे. याचं कारण आपल्या भविष्याचा आणि वर्तमानाचा तो अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. या आनुषंगाने आणखी एका विषयाकडे लक्ष वेधणं गरजेचं आहे. या तापमान वाढीचे काही भीषण आर्थिक परिणाम संभवतात.

एक तर तापमान वाढीमुळे या वर्षीचा उन्हाळा आपल्याकडे मार्चच्या पहिल्या आठवड्यातच आला. त्यामुळे हिवाळा ते उन्हाळा हे संक्रमण झालंच नाही. त्याचा फार मोठा आर्थिक फटका आमच्या शेतीला आणि जीवन व्यवहाराला बसला. त्यामुळेच गेल्या दशकातला नव्हे, तर गेल्या जवळपास ३८ वर्षांमधला हा सर्वात तीव्र उन्हाळा आहे, असं हवामान खात्याने जाहीर केलं. त्यात पुन्हा आपल्याकडे कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे या उष्णतेच्या लाटेचे दुष्परिणाम अधिक काळ आणि अधिक तीव्रतेने जाणवतात. त्यामुळेच आपल्याला वीज कपातीला तोंड द्यावं लागत आहे. वीज नसल्यामुळे कारखाने चालत नाहीत, कारखाने चालत नाहीत म्हणून उत्पादकता कमी, उत्पादकता कमी राहिल्यामुळे तयार होणाऱ्या वस्तूंच्या किमती अनाठायी वाढणार आहेत किंवा त्या वस्तूंच्या विक्रीतून कंपन्यांना होणारा फायदा घटणार आहे. नफा कमी झाल्यामुळे त्यांच्या एकूणच आर्थिक नियोजनाला मोठा फटका बसणार आहे. महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये दुपारच्या वेळी दुकानं शटर संपूर्ण किंवा अर्ध खाली करून बंदच राहतात. त्यामुळे तिथले खरेदी-विक्रीचे व्यवहार नीट होत नाहीत. दुपारच्या वेळी शेतीची कामं जवळपास किंवा अत्यंत थंडावलेली असतात. त्यामुळे त्याचीदेखील उत्पादकता कमी झालेली असते. लक्षात घ्या, आपल्याकडच्या एकूण कामगारांपैकी जवळपास ४५ ते ५० टक्के लोकांना रस्त्यावर किंवा शेतामध्ये उतरून काम करावं लागतं. त्या सगळ्यांना या प्रचंड उन्हाच्या तडाख्याचा त्रास होतो. म्हणून त्यांच्या केवळ तब्बेतीवर नाही तर उत्पादतेकवरदेखील परिणाम होतो. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे युक्रेन आणि रशियादरम्यानच्या युद्धामुळे भारताला गहू निर्यातीमध्ये फार मोठी संधी उपलब्ध झाली. परंतु उन्हाचा तडाखा इतका जबरदस्त आहे की गव्हाच्या अपेक्षित उत्पादनाच्या, म्हणजे १२२ मिलीयन मेट्रिक टनामध्ये सुमारे १५ टक्क्यांनी घट होईल, असा धोक्याचा इशारा कृषिक्षेत्रातल्या तज्ज्ञांनी दिला आहे. आपल्याकडे तयार होणाऱ्या जिऱ्यासारख्या अनेक मसाल्याच्या पदार्थांनादेखील जोरदार फटका बसतो आहे. त्यांची उत्पादकता १५ टक्क्यांनी कमी होत आहे. २०२९ पर्यंत आपण पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचं लक्ष समोर ठेवलं आहे, त्या सगळ्याला अशा गोष्टींमुळे काहीशी खीळ बसते आहे, हे नक्की. हे झालं देशपातळीवरचं. सध्या सर्वांनी उन्हाच्या तडाख्यापासून बचाव करण्यासाठी जे जे करता येईल ते जरूर करावं. उन्हाळा बाधत नाही हे दाखवून द्यावं. यातूनच उनामुळे बसणारा आर्थिक फटका टाळता येईल.

# 'एडका' : आईचे गर्भाशय ते पृथ्वीवरील संघर्षमय प्रवासाची गाथा

**'एडका'** हे डॉ. मुरहरी केळे नावाच्या एका बहुआयामी विद्युत अभियंत्याचे आत्मचरित्र वाचून सुन्न व्हायला होते. हे आत्मचरित्र वाचत असतांना मन:पटलावर अनेक प्रकारची दृश्ये तरळत जातात. त्यात विनोद आहे, करूणा आहे तसेच अपमान, आत्मभान आणि आत्मसन्मानही आढळून येतो. त्यामुळे वाचक आनंदी होत असतांनाच काही प्रसंगामुळे अस्वस्थही होतो. 'एडका' या आत्मचरित्रात डॉ.केळे यांच्या अव्यक्त मनाच्या तळाशी घुटमळणाऱ्या संवेदनाची, गरिबीची, त्यांच्या आयुष्यात आलेल्या सामाजिक, प्रशासकीय आणि राजकीय कुरघोड्यांची, त्याविरुद्ध केलेल्या संघर्षमय प्रवासाची ही चित्तथरारक चित्तरकथा होय. आत्मचरित्र लेखनाची प्रेरणा ही आपले दुःख सांगून आपल्या मनावरचा भार हलका करावा ही असते. ज्या व्यवस्थेमुळे आपल्या वाट्याला हे दुःख आले आहे, ते इतरांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्या व्यवस्थेवर बोट ठेवत ही व्यवस्था कुठेतरी बदलली पाहिजे, असा डॉ.मुरहरी केळे यांचा मानस आणि सततचा ध्यास असल्याचे स्पष्ट दिसून येते.

सोलापूर येथील अन्वी प्रकाशनातर्फे प्रसिद्ध केलेल्या ३९८ पानांच्या 'एडका' या ग्रंथाचे 'कोकरू', 'बालिंगा', 'एडका' व 'एडक्याच्या धडका' असे चार भाग आहेत. त्यात पहिल्या 'कोकरू' या भागामध्ये जन्मापासून बालपणापर्यंतच्या प्रवासातील गंमती-जमती बरोबरच गरिबीशी संघर्ष आहे. लेखक लहानपणी माती खात असल्यामुळे लेखकाच्या फुगलेल्या पोटाला ब्याटरीच्या काळ्या कांडीने वैदुने दिलेले डाग आजही लेखकाच्या मनावर कोरलेले दिसून येतात. हीच गोष्ट ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था आणि अंधश्रद्धा दाखवते. 'कोकरू' या भागात गावगाडा, खेड्यातील बलुतेदारी, आईवडिलांच्या वाट्याला आलेले कष्ट, दुष्काळात होरपळून गेलेलं जीवन, सात पत्र्याच्या घरातील सात माणसांचा संसार, लेखकाचा जन्म, त्या काळातील खेळ, एकशिक्षकी शाळेत वाट्याला आलेले शिक्षण, इत्यादी प्रसंग आलेले आहेत. परंतु त्या काळातील गरिबी मात्र अंगावर येते. भूख लागल्यावर जनावरासाठी आणलेली पेंड खाणे, बरबडा खाणे असे प्रसंग लेखकाचे बालपण खुडून टाकतात, त्यावेळेस वाचकच्या मनाला अस्वस्थता येते. 'बालिंगा' म्हणजे तरुण मुसमुसलेला मेंढा. पुस्तकाच्या 'बालिंगा' या दुसऱ्या भागात प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण घेताना दारिद्र्यामुळे स्वतःच्या वाट्याला आलेलं अपमानास्पद जगणं, त्यातून उभा राहिला संघर्ष, आईवडिलांची आयुष्यभर शारिरीक कष्टाची कामे करून मुलाला शिकवण्याची धडपड, मुलाने केलेल्या चुका, असा प्रवास उभा झालेला दिसतो. 'एडका' या पुस्तकाच्या तिसऱ्या भागात नोकरी, लग्न, कौटुंबिक व प्रापंचिक जीवनाचे चित्रण केले. त्यात लेखकाच्या भाऊ, बहिण, मुलगी, पत्नी, आई, वडील, सासू यांच्या मृत्यूचे प्रसंग त्यातून उभा राहिलेला न्यायालयीन खटला अंगावर काटा उभा करतात. त्यातूनही लेखक कोलमडून न जाता प्रचंड यातना सहन करून तो उभा राहतो आणि पुन्हा संघर्षाला तयार होतो. 'एडक्याच्या धडका' या विभागात नोकरी करत असतांना आलेले अडथळे, वरिष्ठ पदांवर काम करत असतांना त्यातील जातकारण, समाजकारण, अर्थकारण, राजकारण अतिशय प्रभावीपणे, सडेतोडपणे आणि निर्भयपणे त्यांनी मांडले आहे.

या लेखाच्या शीर्षकांमध्ये 'आईचे गर्भाशय ते पृथ्वीवरचा धगधगीत संघर्षमय प्रवास' असा उल्लेख मी केलेला आहे, त्याचे कारण डॉ.मुरहरी केळे यांचा प्रवास जन्मल्यापासून नाहीतर आईच्या गर्भात आल्यापासूनच सुरु आहे. काही लोक 'गर्भश्रीमंत' असतात तर डॉ. केळे हे 'गर्भसंघर्षी' आहेत. दुःख, दैन्य, दारिद्र्य, संघर्ष काही लोकांच्या पाचवीलाच पुजलेले असते परंतु डॉ. मुरहरी केळे यांच्या बाबतीत ते गर्भातच पुजलेलं होतं. गर्भात आल्यापासूनच त्यांच्या वाट्याला नियतीशीच संघर्ष करावा लागला. जन्माच्या आधीपासूनच नानीला म्हणजे लेखकाच्या आईला ना 'माहेर' होते ना 'सासर' होते. अफाट दारिद्र्य, उपासमार, काबाडकष्ट, मानसिक त्रास, इत्यादी संकटे असतांना बाळाला जन्म देण्यासाठी किंबहुना गर्भ वाढवण्यासाठी एक सशक्त आई लागते, नसता बाळाची वाढ न होता गर्भपात होऊ शकतो. मुरहरी केळे यांच्या आईसाठी कुठलीच परिस्थिती अनुकूल नव्हती. तरी आईच्या गर्भातच मुरहरी यांनी ही सर्व आव्हाने स्वीकारून त्यांच्याशी झगडत राहिले व आईची नाळ घट्ट पकडून ठेवली. म्हणून खऱ्या अर्थाने त्यांचा संघर्ष आईच्या गर्भाशयातून सुरू झाला, असे म्हणावेसे वाटते.

या आत्मचरित्रात फक्त शिकण्यासाठी भोगलेल्या व्यथाच आहेत असे नाही, तर दरिद्र्यी, अज्ञानी, ग्रामीण कुटुंबाचे हलाखीचे जीवन, आपल्या वडिलांचा 'सोपान्या' ते 'वै.ह.भ.प. सोपानकाका केळे महाराज इथपर्यंतचा थक्क करणारा प्रवास, गावातील रुढी परंपरा, निसर्ग, दुष्काळ, नियती, शालेय जीवनातील प्रसंग, महाविद्यालयीन जीवन, विविध व्यक्तीचे स्वभाव वैशिष्टे, घरात अकस्मात घटना घडून आलेला अपमृत्यू, दारिद्र्याने घेतलेले बळी, इत्यादी अनेक बाबींचे वास्तव चित्रण आहे. एका चिमुकल्या अंधश्रद्ध खेड्यातील गरीब कुटुंबातून पुढे आलेल्या मुलांच्या या संघर्षगाथेत नायकाचा बाप मात्र मुलाच्या प्रगतीसाठी, अध्यात्मिक शिक्षणासाठी सतत प्रेरणा देणारा आहे. आपल्या अपत्याची क्षमता, सामर्थ्य ओळखणारा आहे, चुकीच्या ठिकाणी मौनातून त्याला वठणीवर आणणारा आहे. या आत्मचरित्राचा आणखी एक वैशिष्टय म्हणजे वाचकाला अस्वस्थ करण्याचे, गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे. दुसरी जमेची बाजू म्हणजे लेखकाने आपल्या दुःखाचे कुठेच भांडवल केलेले नाही. गरीबीचे प्रचंड चटके भोगूनही त्याविषयीचा कडवटपणा व आक्रस्ताळेपणा यात लवलेशही दिसत नाही. उलट परिस्थितीवर मात करत, रडत न बसता, सतत टक्कर देणारा हा एडका हा 'रडका' नसून 'धडका देणारा नायक' असल्याचे आत्मचरित्रातून वारंवार दिसते. हे आत्मचरीत्र स्वप्रसिद्धी, आत्मगौरव, यासाठी मुळीच लिहिलेले नसून एका चिंतनशील मनाने जीवनात भोगलेल्या व्यथा, मन:पटलावर तरळत राहणाऱ्या घटना, आतल्या आत ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या मनाचे अस्वस्थ कथन चित्रीत झालेले दिसून येते.




नायकाच्या जीवनाचा कार्यपट आपल्या मात्या पित्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आयुष्यभर काबाडकष्ट करणाऱ्या मात्यापित्याची संस्कारमय शिदोरी त्यांनी आत्मचरित्रात जागोजागी सोडलेली दिसून येते. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, पत्रकारिता, संगणक, माहिती तंत्रज्ञान, उर्जा अन्केक्षण, मराठीत पदव्युत्तर पदवी, पीएच.डी अशा दहा पेक्षा जास्त पदव्या मिळवलेला उच्च विद्याविभूषित असून त्याच्या आधारे वीज मंडळात कनिष्ठ अभियंता ते देशातील अनेक राज्यात संचालक, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अशा सर्वोच्च पदावर काम करून महाराष्ट्र, मध्यप्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, मणिपूर या राज्यांसह नेपाळ आणि बांगलादेश या देशांनाही वीज पुरवठा करणारा अधिकारी इथेच थांबत नाही तर देश विदेशातील अनेक विद्यापीठात शोध निबंध लिहून त्याचे चीन, इंग्लंड, जपान, अमेरिका यासारख्या देशात सादरीकरण करतो. राज्य स्तरावर, देशपातळीवर अनेक नाविन्यपूर्ण कामे करून वीज क्षेत्रातील एक मोठे नाव म्हणून डॉ.केळे यांच्याकडे पहिले जाते. देशातील वीज क्षेत्रात मोठमोठी मानाची पदे भूषवत असतांना त्यांचा अध्यात्मिक व्यासंग कमी होत नाही, याउलट त्यांच्या वडिलांची परंपरा पुढे चालवतांना ते प्रवचनकार, व्याख्याते, कीर्तनकार अशा भूमिकेतून दिसतात. या व्यतिरिक्त चित्रपटासाठी पटकथा लिहित लिहित 'मला आई पाहिजे' या मराठी चित्रपटातून भूमिकाही करतात. साहित्यिक क्षेत्रातही त्यांनी नाव मिळवलेले आढळते. त्याची गेल्या तीस वर्षातील अनेक वर्तमानपात्रे, विशेषांक, मासिके यांच्या अनेक लेख तर लिहिलेच परंतु स्वतःची मराठी आणि इंग्रजी भाषेतील दहा पुस्तके लिहिणारा डॉ.मुरहरी केळे यांचा प्रवास शब्दात मावत नाही. अनेक साहित्यसंमेलनात अध्यक्ष, उद्घाटक, स्वागताध्यक्ष, म्हणून ठळक सहभाग असतो. अनेक पुरस्कारांनी गौरविलेला असा माणसातला माणूस जेव्हा त्रिपुरा वीज मंडळाच्या अध्यक्षांच्या खुर्चीत बसल्यावर आपल्या मातीची आठवण करतो, तेंव्हा डॉ. केळे यांची आपल्या मातीशी व माणसाची नाळ अजुनही किती घट्ट आहे आणि त्यासाठी डॉ.केळे हे अनेकदा व्याकूळ झाल्याचे दिसून येते.

**– श्री. हरीश कवडे**
**जिंतूर, जि. परभणी**
**(मो. ९१३०६२५८३२)**

डॉ.केळे यांच्या जीवनामध्ये जशी चांगली माणसे आली तशीच त्यांच्या वाटेवर काटे पेरणारे लोकही भेटले. नोकरी करत असतांना वीज कंपनीमध्ये अनेक विघ्नसंतोषी माणसांनी त्यांच्या बदली, बढती, निवड, पुरस्कार देतांना ठरवून अडथळे आणले. बऱ्याच वेळा राजकारण, जातकारण, पूर्वग्रहदूषितपणा इत्यादीमुळे त्यांच्यावर वारंवार न्याय झाला. तरीही सर्वांना माफ करत आपल्या मनाचा मोठेपणा दाखवतात. सर्वांचे स्वभाव दोष दाखवून व्यवस्थापणाचा मुखवटा टराटरा फाडतात, तरीही शेवटी 'बळी तो कान पीळी' या न्यायानेच जग चालते हे सत्य स्वीकारून सर्वाना माफ करत सर्व स्वीकारण्यात त्यांना कुठेही संकोच वाटत नाही. यासारख्या अनेक कारणांमुळे हे आत्मचरित्र सत्य आणि खरे उतरले आहे, हे लक्षात येते.

या आत्मचरित्रामध्ये विविध प्रसंगी मानवी मनांची भावांदोलने, सुखदुःखाचे प्रसंग, असे अनेक घटक जरी एकत्रित झालेले असले तरी त्याचा केंद्रबिंदू म्हणजे डॉ. केळे हे कुठेही ढळलेले दिसत नाहीत. त्यांची कंपनीविषयी, कामाविषयी निष्ठा आणि खरेपणा तसूभरही कमी होत नाही. त्यामुळे त्यांचे 'एडका' हे आत्मचरित्र संघर्षमय प्रवासाचे वर्णन असले तरी ते केवळ व्यक्तिगत आयुष्याचे वर्णन नसून त्यातून वर्तमान परिस्थितीचे सखोल चिंतन, भूतकाळातील जाणीवांचे स्मरण आणि भविष्यांचा घेतलेला अचूक आणि सूचक वेध मांडण्यात आणि त्यांच्या उभ्या आयुष्यातील कार्य-कर्तुत्वाचा, न्याय हक्कासाठी त्यांनी लढलेल्या संघर्षाचा आलेख स्पष्टपणे मांडण्यात ते यशस्वी झाले आहेत.

'एडका' या पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय देखणे असून मलपृष्ठावर सुप्रसिद्ध समीक्षक, जेष्ठ साहित्यिक डॉ.अक्षयकुमार काळे यांची पाठराखण असल्यामुळे मलपृष्ठही तेव्हढेच आकर्षक झाले आहे. मुखपृष्ठावरील गडद पसरलेल्या काळोखात कंदीलात लावलेल्या बल्बचा सौम्य प्रकाश अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखवतो तर त्या कंदिलातील बल्ब मागासलेपणाकडून तंत्रज्ञानाकडे, ज्ञानातून विज्ञानाकडे जात असल्याचे प्रतिक आहे. बल्बमधील फिल्यामेंट मधील मेंदूची आकृती म्हणजे ज्ञान-विज्ञान मिळवून आपली अध्यात्मिक उन्नती करून जीवनदशेतून अनंताकडे जाण्याचा मार्ग दाखवते. असे मुखपृष्ठ सौंदर्यदृष्टीला सुख देणारे आणि विचारांना चालना देणारे आहे, मनाला मोहिनी घालून बुद्धीला आव्हान करणारे आहे. या मुखपृष्ठास पाहून संत ज्ञानेश्वरांची दुसऱ्या अध्यातील ओवी आठवते,

जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रकटी । तैसी सद्बुद्धी हे थेकुटी । म्हणों नये ?२३८?

येथे ज्ञानेश्वरांनी ज्ञानाच्या प्रकाशाची तुलना दिव्याच्या ज्योतीशी केली आहे. जसे दिवा तेजस्वी असतो तरीही त्याच्या आवरणामुळे त्याचा प्रकाश लपत नाही, त्याचप्रमाणे सद्बुद्धी देखील अडचणींमुळे लपत नाही आणि ती नेहमीच प्रकट होते. अर्थात ज्या कंदिलाच्या प्रकाशात डॉ.केळे यांनी एकेकाळी अभ्यास केला आणि त्या ज्ञानरूपी प्रकाशाचा दिवा डोक्यात पेटला, पुढे तोच प्रकाश मुरहरी केळे या 'प्रकाशयात्री'ने देश-विदेशातील सीमा पार करून घराघरात, दऱ्याखोऱ्यात, पोहोचवला, हा केवढा योगायोग आहे. मुखपृष्ठावर एडका हे शीर्षक पांढऱ्या रंगांमध्ये आहे. पांढऱ्या रंग हा शांततेचे प्रतीक आहे, परंतु एडका हा प्राणी शांत नसतो. येथे हा विरोधाभास वाटतो परंतु डॉक्टर केळे यांची जडणघडण वारकरी घराण्यात झालेली असल्यामुळे त्यांच्या आई-वडिलांनी त्यांच्यावर केलेले चांगले संस्कार, प्रेम, शांतता, संयमीपणा, इत्यादी अनेक गुण त्यांच्यात दिसून येतात. परंतु त्याचबरोबर त्यांची वृत्ती मात्र 'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास ६ कठीण वङ्कास भेदूं ऐसे ? अशी आहे.

आत्मचरित्राचे 'एडका' हे शिर्षक आशयघन, आगळे वेगळे व समर्पक आहे. मेंढ्यातील नर जातीस एडका म्हणतात. 'एडका' हे सृजनशील नवनिर्मितीचे, सामर्थ्याचे आणि नेतृत्वाचा आदर्श मांडणारे प्रतीक आहे. त्याचं एक वैशिष्ट्य म्हणजे तो कोणाशी धडक देण्यास, संघर्ष करण्यात तयार असतो. समोर कोण आहे त्याची त्याला तमा नसते. संत एकनाथ म्हणतात, 'एडका मदन मदन, तो केवळ पंचानन' या कामरूपी एडक्याच्या धडकेत ब्रह्मादीक सुद्धा गार झाले. म्हणून या आत्मचरित्राचा नायक एडक्याचे प्रातिनिधित्व करताना आईच्या गर्भाशयापासून ते आजपर्यंत नियती, समाजव्यवस्थेची सातत्याने संघर्ष करताना दिसतो. म्हणून 'एडका' हे शीर्षक अगदी समर्थक आणि सार्थ वाटते. हे आत्मचरित्र अतिशय प्रामाणिकपणे, संयमीपणाने लिहिलेले असून त्यातील निवेदन प्रांजळ, रसाळ आणि सत्य निवेदन आहे. अत्यंत ओघवत्या भाषेतील आत्मचरित्राची भाषा ओजस्वी व प्रासादिक आहे. बोली भाषेतील संवादामुळे एकूण प्रसंगांना व संदर्भांना जिवंतपणा येतो. भाषेतील गोडवा, त्यात येणारी व्यक्तीचित्रणे, त्यात वावरणारी पात्रे, त्यातील प्रसंगानुसार तयार केलेली वातावरण निर्मिती इत्यादी अनेक बाबी वाचकांना खिळवून ठेवतात. एका बहुआयामी विद्युत अभियंत्याच्या

..पान ३ वर

# महाराष्ट्राचा विकास गतिशील करण्यासाठी राजकीय पुढाऱ्यांनी तत्परता दाखवावी

**महाराष्ट्र** दिवस मराठी भाषीकांसाठी आनंदाचा व गौरवाचा दिवस आहे. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली. तेव्हापासुन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने व थाटाने महाराष्ट्र दिवस साजरा केल्या जातो. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्राच्या विकासाकडे आवर्जून लक्ष देण्याची गरज आहे.कारण आज महाराष्ट्रातील अनेक राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आहे हा पैसा राज्याच्या विकासासाठी वापरायला तर राज्याचा विकास अवश्य भरभराटीला येईल. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा, शुरविरांचा, क्रांतिकारकारकांचा, थोरमहात्म्याचा व साधुसंतांची पावन भूमी आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारकडून जनतेला (प्रजेला) कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची जबाबदारी सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी, सत्ताधाऱ्यांनी व पक्ष-विपक्षनी स्वीकारून जनतेच्या कल्याणासाठी संपूर्ण शक्तीनीशी कार्य करण्याची गरज आहे.

तेव्हाच महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत होईल व विकास भरभराटीला येईल. कारण सध्याच्या परिस्थितीत विकासाच्या बाबतीत केंद्राची व राज्याची संपूर्ण धुरा राजकीय पुढाऱ्यांच्या हातात आहे. सत्ताधाऱ्यांनी विकासाची कामे करणे व कोणते काम करायचे आहे हे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना सांगणे. अशाप्रकारचे हे राजकीय चक्र असायला हवे. परंतु सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्राच्या विकासापेक्षा पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी एकमेकांची उखाड-पाखाड करून स्वतःच्या विकासाकडे जास्त लक्ष देतांना दिसतात. त्यामुळे महाराष्ट्राचा विकास खुंटत आहे ही राज्याची शोकांतिका म्हणावी लागेल. राजकारण्यांच्या वादांमुळे जर राज्याचा विकास खुंटला तर त्याचे प्रायचित्य राज्यांच्या १२ कोटी जनतेला भोगावे लागेल महाराष्ट्रात बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, शिक्षणाच्या समस्या असे अनेक ज्वलंत प्रश्न आहे. परंतु गेल्या चार वर्षांत राज्यात मोठ्या प्रमाणात राजकीय भुकंप होऊन उलथापालथ दिसून आली व यात राज्याला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका सुध्दा बसला हे सर्वांनाच ठाऊक आहे.

राजकीय पुढारी आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी मोठ्या प्रमाणात डावपेच खेळतात परंतु यात सोंड्यासारखा भरडल्या जातो गोर-गरीब, सर्वसामान्य, शेतकरी, बेरोजगार युवक यावर सरकारने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. राज्याच्या विकासापेक्षा ईडी, सीबीआय अशाप्रकारच्या अनेक मुद्यांवर वाकयुध्द आताही सुरू असल्याचे दिसून येते.यांच्या वाकयुध्दाशी राज्यांच्या जनतेला काहीही देणेघेणे नाही.परंतु राज्यातील महागाई, बेरोजगारी, शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या यावर जनतेचा होहल्ला होवू नये यासाठी राजकीय पुढाऱ्यांची ही वाक युध्दाची खेळी खेळत असावी असे मला वाटते. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की महाराष्ट्र दिनाला कोणतेही राजकीय वळण येणार याची काळजी घेतली पाहिजे.

कारण सध्याच्या परिस्थितीत लोकसभा निवडणुका सुरू आहे व पुढे विधानसभा निवडणुका येणार आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्षाचा राजकीय पुढारी आपली पोळी कशी शेकता येईल या उद्देशाने आपली खेळी खेळत आहे. परंतु यात राज्याचा नागरिक भरडतो आहे.आज महाराष्ट्रात अनेक गंभीर समस्या आहेत सुर्य तळपतो आहे यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आपल्याला पाण्याची समस्या पहायला मिळते तर दुसरीकडे अवकाळी पावसामुळे राज्याच्या शेतकऱ्यांना गारपिटीने झोडपले आहे यामुळे शेतकऱ्यांना अनेक कठीणायीचा सामना करावा लागतो आहे.याकडे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुठभर मावळ्यांच्या बळावर हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व प्रजेची सेवा केली. परंतु आज महाराष्ट्राचा राजकीय पुढारी गर्भश्रीमंत झाल्याचे दिसून येते. परंतु प्रजा मात्र गरीबीतच मरत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात असे चित्र निर्माण झाले आहे की 'राजकीय पुढारी तुपाशी आणि महाराष्ट्राची जनता उपाशी'अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय पुढाऱ्यांनी मनात ठानले राज्याचा विकास भरभराटीला येवु शकतो.याकरीता राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे यामुळे महागाई, बेरोजगारी, शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या याला आळा घालण्यास मोठी मदत होईल व सुवर्ण महाराष्ट्र निर्माण झाल्याचे दिसून येईल.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी शपथ घेतली पाहिजे की राज्याच्या कठीण घडीला आपले संपूर्ण मतभेद विसरून महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेसाठी युध्दपातळीवर तन,मन, धनाने प्रयत्न करून महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देण्याची गरज आहे. केंद्र सरकारने अनेक राज्यात गरीबांना रेशनकार्डवर अन्नधान्य मोफत ही योजना राबविण्यात येत आहे त्याचे स्वागतच.परंतु राज्यासह देशाची मोठी समस्या शिक्षण व आरोग्य सेवा आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने राज्याच्या कल्याणासाठी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शिक्षण व आरोग्य सेवा मोफत करण्यास प्रथम प्राधान्य द्यायला हवेत याचा फायदा राज्याच्या जनतेला अवश्य होईल.यातच खरा महाराष्ट्र दिवस साजरा केल्याचे दिसून येईल.

आज महाष्ट्राच्या विकासासोबत पृथ्वीला वाचविण्याचे दायित्व राजकीय पुढाऱ्यांसोबतच जनतेवर आहे. त्यामुळे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्याच्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी व जनतेनी एकतरी झाड लावुन महाराष्ट्र दिवस साजरा करायला हवा.यामुळे महाराष्ट्रातील हवेतील वातावरण शुद्ध राहिल, ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल, गुरांना चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा मिळेल.अशाप्रकारे आल्हाददायक वातावरणात निर्माण होईल.महाराष्ट्र दिना निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

## महाराष्ट्र दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अप्पर आयुक्त बाबासाहेब बेलदार, उपायुक्त जगदीश मिनीयार, उपायुक्त अनंत गव्हाणे , उपायुक्त सुरेश बेदमुथा, उपायुक्त श्रीमती पोरे, उपायुक्त किरण गिरगावकर, सहाय्यक आयुक्त श्रीमती आंधळे, राजेंद्र अहिरे, श्रीमती सीमा जगताप, सहाय्यक आयुक्त राम लाहोटी, तहसीलदार अरुण पावडे, तहसीलदार श्रीमती सुवर्णा पवार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# शिवपूराण कथा ऐकतांना श्रद्धा, सबुरी व विश्वास असेल तर जीवनातील दु:ख,समस्या संपतात- हभप समाधान महाराज शर्मा

वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) - शिवमहापुराण कथा ऐकताना प्रत्येक शिवभक्त ने ध्यान केंद्रित करून कथा श्रद्धेने, श्रवण करून मनात सबुरी व आत्मविश्वास बाळगावा तरच त्या भक्तांच्या जीवनातील समस्यांचे जाळे दूर होऊन, सुखाची अनुभूती येते असे अमृत वचन बुधवार (ता. ०१) रोजी शिवपूराण कथाकार हभप समाधान महाराज शर्मा यांनी केले. ते येथील श्री साईभक्त बहुउद्धेशिय सेवा भावी संस्थेने आयोजित केलेल्या श्री शिवमहापुराण कथेचे तृतीय पुष्प गुंफत होते.

ते पुढे म्हणाले की,भगवान शंकराची त्यांच्या पिंडीची, त्यांच्या रुद्राक्षची विधी अत्यंत मांगल्यमय, शुद्ध मन व शुद्ध आचार, विचार व संचारांनी करणे गरजेचे आहे. त्यांनी रुद्राक्ष चे मांगल्य व पावित्र्य राखून पूजन करावे असेही ते पुढे म्हणाले 'भोले बाबा, भोले बाबा -भोले बाबा ओ भोले बाबा या भगवान शंकराच्या



प्रार्थनेने कथेचा आरंभ केला. या प्रसंगी सर्वश्री ऋतिक राजपूत, भरत उचित, विनोद आहेर, अमोल उशीर, कुणाल चव्हाण, दिनेश वैष्णव, आदित्य जोशी, ऋतिक संचेती, राहूल राजपूत यांनी महाराजांचे पूजन केले. रात्री दहा वाजता या कथा संपतात, यासाठी संस्थेचे सर्वश्री विशाल शेठ संचेती, कैलास शेठ साखरे, राजेंद्र लालसरे, जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, महेंद्र काटकर, राम उचित, जितेंद्र चापानेरकर, अण्णा अधिकार, प्रशांत गायकवाड, मनोज गायकवाड, उमेश राजपूत, मनोज दौडे सहभाग नोंदवीत आहेत. या कथा श्रवण साठी महिलांची मोठी संख्या आहे.

यासाठी अंजली जोशी, योगिता साखरे, प्रवीना वाळेकर, विनोद गायकवाड, उमेश वाळेकर सहकार्य करीत आहेत.

## वैजापूरच्या शिवमहापुराण कथेत अवतरले, प्रति ब्रह्मा, प्रतिविष्णू, प्रतिमहेश



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) - श्री. साईभक्त बहू उद्धेशिय सेवा भावी संस्थेच्या वतीने श्रीशिवमहापुराण कथा वैजापूरात सुरू आहेत,या कथात प्रसंगानुरूप विविध झाकिया, दृश्य सादर होत आहेत. बुधवार(ता.०१)रोजी नारद मुनी यांच्या प्रवेशासोबत प्रति ब्रह्मा, म्हणून धोंडीरामसिंह राजपूत तर महेश म्हणून बॉबी अनिल त्रिभुवन,विष्णू म्हणून कमलेश आंबेकर व लक्ष्मी म्हणून लक्ष्मी आंबेकर यांनी भूमिका सादर केल्या आणि नारदमुनी ची भूमिका रोहित उचित यांनी मनभावक भूमिका सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. आता शिवमहापुराण कथातील प्रसंगानूरुपच्या दृश्य देखाव्यांनी श्रोते उत्सुकतेने कथा श्रवण करण्याचा आनंद घेत आहेत, या साठी श्री वैष्णव, राम उचित,महेंद्र काटकर, मनोज दौडे, शैलेश पोंदे, प्रेम राजपूत, सुधीर लालसरे, कचरू राजपूत, अण्णा अधिकार, गणेश अनर्थे, यांचे सहकार्य या कामी लागत आहे. संस्थापक अध्यक्ष कैलास साखरे, उत्सव समिती अध्यक्ष विशालशेठ संचेती, यांच्या मार्गदर्शनाखाली धोंडीरामसिंह राजपूत नियोजन व सूत्र संचलन करीत आहे, गुरुवार(ता.०२)रोजी विनोद गायकवाड, उमेशशेठ वाळेकर, प्रविणा वाळेकर, इंदरशेठ बोथरा, सिद्धेश्वर साखरे, प्रशांत साखरे, संतोष चिनके, जितेंद्र चापनेरकर, प्रतीक्षा मोकळं यांनी आरती केली.

## हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारकात वीर पत्नी गोदावरीताई राजपूत यांच्या हस्ते ध्वजारोहण

वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) - मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनिक स्व. नारायणसिंह राजपूत यांच्या वीर पत्नी श्रीमती गोदावरीताई नारायणसिंह राजपूत यांच्या हस्ते येथील पालिकेच्या हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारकात महाराष्ट्र दिनी बुधवार(ता. ०१)रोजी ध्वजारोहण करण्यात आले, राष्ट्रगीत झाल्यानंतर महाराष्ट्र गीत ही वाजविण्यात आले.



या प्रसंगी उपमुख्याधिकारी राहुल साठे, महाराष्ट्र शासनाचे दोन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, दशरथ बनकर, स्वातंत्र्य सौनिक कुटुंबीय श्रीमती कमलाबाई लोंढे, श्रीमती भोसले ताई, श्री मिटकरी, श्री, देशपांडे, मोती हिवाळे, तसेच न,प,कर्मचारी स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, जयपाल राजपूत, वाल्मिक शेटे, अरुण कुलकर्णी, डॉ. सविता निकाळे, मिलिंद साळवे, शंकर जोरे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

नगरपालिका कार्यालयात ऊप मुख्याधिकारी राहुल साठे यांनी ध्वजारोहन केले. या ठिकाणी कार्यक्रम संपल्यावर धोंडीरामसिह राजपूत यांनी मतदार जागृती करून सर्वांना येत्या निवडणुकीत मतदान करण्याचे व लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी डॉ. निलेश भाटिया, स्वप्नील जेजुरकर, सखाहरी बर्डे, आर.पी. क्षीरसागर, एम.आर. गणवीर, गंगारामसिंह राजपूत यांच्यासह न.प.कर्मचारी उपस्थित होते. शहराच्या ईतर कार्यालयात कार्यालय प्रमुख यांनी ध्वजवंदन करून महाराष्ट्र दिन साजरा केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन धोंडीराम ठाकूर यांनी केले आभार अरुण कुलकर्णी यांनी मानले.

# आता रोबोटद्वारे करणार मॅनहोल चेंबरची क्लिनिंग

## मनपाची आत्मनिर्भर्तेकडे यशस्वी वाटचाल



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - महानगरपालिकेद्वारे खरेदी करण्यात आलेल्या व्हेईकल माऊंटेड मॅनहोल क्लिनींग रोबोट द्वारे आता मॅनहोल चेंबर ची सफाई करता येणार आहे. ०१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून महानगरपालिका मुख्यालय येथे मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते या व्हेईकल माऊंटेड मॅनहोल क्लिनींग रोबोट चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,शहर अभियंता ए.बी देशमुख,कार्यकारी अभियंता यांत्रिकी अमोल कुलकर्णी,यांत्रिकी विभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.

शहरातील ड्रेनेज लाईन्स व चेंबर्स स्वच्छ करण्यासाठी मनपाकडे सद्य स्थितीत जेटींग मशिन्स, व्हॅक्युम मशिन्स, डिसेल्टींग मशिन्स व पॉवर रॉडींग मशिन्स कार्यरत आहेत. मात्र कॅमेराचा वापर करुन चोकअप असलेल्या तंतोतंत जागेचा शोध घेवुन ड्रेनेज लाईन व मॅनहोल चेंबर स्वच्छता करणारी विशिष्ट प्रकारची मशिनरी ची कमतरता होती.

भारत सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत ड्रेनेज लाईन्स व मॅनहोल चेंबर्स स्वच्छ ठेवण्यासाठी अत्याधुनिक रोबोटच्या वापरास प्राधान्य देण्यात येते. या पार्श्वभुमीवर व्हेईकल माऊंटेड मॅनहोल क्लिनींग रोबोट ०१ वर्ष देखभाल दुरुस्तीसह खरेदी करण्यासाठी जीईएम पोर्ट्लद्वारे निविदा प्रकिया राबविण्यात आली.

निविदेअंती मे. जनरोबोटीक इनोव्हेशन्स प्रा.लि. यांचेकडुन ०२ व्हेईकल माऊंटेड मॅनहोल क्लिनींग बँडीक्युट रोबोट ०१ वर्ष देखभाल दुरुस्तीसह रु २,०९,००,०००/- रकमेत खरेदी करण्यात आले आहेत. सदरील बँडीक्युट रोबोट अशोक लेलँड कंपनीच्या बडा दोस्त या चेसीसवर उभारणी करण्यात आले असुन, या रोबोटद्वारे ०८ मिटर खोली पर्यन्तचे मॅनहोल चेंबर तसेच १.५ मिटर लांबी पर्यन्तचे ड्रेनेज लाईन साफ करता येते.

तसेच सदरील रोबोटला ७२० pixel resolution आणि 120 degree wide angle असणारे ०४ underwater camera असुन, या कॅमेराद्वारे ड्रेनेज लाईन व चेंबर मधील मलबा शोधुन रोबोटच्या सहाय्याने बाहेर काढण्यात येतो. खरेदी करण्यात आलेल्या रोबोटमुळे ड्रेनेज लाईन व मॅनहोल चेंबर स्वच्छ ठेवणे अत्यंत सोईस्कर होणार असुन, शहरातील स्वच्छतेवर देखील नियंत्रण राहणार आहे, अशी माहिती यांत्रिकी विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

## विभागीय माहिती कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सर्वांनी राष्ट्रीय ध्वजास सलामी देऊन राष्ट्रगीत म्हटले. याप्रसंगी माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास, सहायक संचालक गणेश फुंदे, सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर, प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी आदींसह संचालक कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, माहिती केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ संभाजीनगर आयोजित ५१सर्वशाखिय उपनयन संस्कार २०२४ यशस्वी संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - दे. ऋ. ब्राह्मण मंडळ आयोजित ५१ बटुंचा उपनयन संस्कार पार पडला (४ वर्ष ) या उपनयन संस्कारात १५०० जण बटुं आर्शिवाद देण्यासाठी उपस्थित होते तसेच ङमहाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे साहेब उपस्थित राहून बटूस शुभाशीर्वाद दिले व ब्राह्मण समन्वय समितीचे मिलिंदजी दामोदरे कव्हचे धनंजय पांडे, विजया अवस्थी गीता आचार्य यांनी सुद्धा उपस्थित राहून बटूस शुभ आशिर्वाद दिले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी महिला अध्यक्ष मोनिका चौधरी उपाध्यक्ष रवि जहुरकर, कोशाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, पदाधिकारी श्रीपाद मुगुटे, प्रशांत दाभाडकर, नरेश पटवर्धन, वैभव देशपांडे, डॉ अमोल पांडव, गोपाळ कुलकर्णी, मिलींद दाभाडकर, पद्माकर कोटचिरकर, तसेच महिला पदाधिकारी सीमा कस्तुरे, उत्कर्शा पारनेरकर, मयुरी दाभाडकर, योगिनी देशमुख, कल्पना जोशी, संध्या मुगुटे, प्रिया कुलकर्णी, जयश्री अकोलकर, सुनीता जोशी, दीपा देशपांडे, अलका जोशी, तनिषा पराडकर, रागिणी पुसेगावकर, निता कुलकर्णी, राधिका कुलकर्णी, मानसी, साक्षी दाभाडकर, समृध्दी चौधरी, चैताली जेहूरकर, आर्यन जोशी, तन्वी देशपांडे त्याबरोबरच अभिरवेद इव्हेंट मॅनेजमेंटचे रवींद्र जोशी, स्वानंदी जोशी यांनी मोलाचे सहकार्य केले.

श्री मंदार कुलकर्णी गुरुजी आणि त्यांच्या बरोबर त्यांचा सहकार्याचे पौरोहित विधीचे कार्य सुंदर कार्य पार पडले. हा कार्यक्रम दरवर्षी प्रमाणे यशस्वी पार पडला आहे.

## श्री गुजराती विद्या मंदिराचे १९६८च्या बॅचचे विद्यार्थी ५६ वर्षांनी भेटले





छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - श्री गुजराती विद्या मंदिर छत्रपती संभाजी नगर या शाळेमध्ये १९६८ यावर्षी अकरावी म्हणजे तत्कालीन मॅट्रिक ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी चे एकत्रीकरण दिनांक २६ एप्रिल रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाला बॅचचे विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. सुरुवातीला प्राथमिक परिचय करून दिल्यानंतर १९६८ नंतर आपण काय काय केले याची सविस्तर माहिती प्रत्येकाने दिली.

या बॅचचे बहुतांशी विद्यार्थी विद्यार्थिनी उच्चविद्याविभूषित आणि चांगल्या ठिकाणी नोकरी करणारे ,शिवाय स्वतःचे व्यवसाय करणारेही आहेत. काही विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यामध्ये अशा भेटी वारंवार व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमात डॉ. अभय मंडलिक हे खामगाव अर्बन को-ऑपरेटिव बँकेत संचालक म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार रमाकांत बाऱ्हाळे यांनी सर्वांच्या वतीने केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुण जोशी, हरीश पटेल, रमाकांत बाऱ्हाळे, पंकज शहा ,अभय मंडलिक यांनी परिश्रम घेतले. या एकत्रीकरणासाठी बरेच विद्यार्थी विद्यार्थिनी बाहेर गावाहून आले होते.

..पान २ वरून

## 'एडका' : आईचे गर्भाशय ते पृथ्वीवरील संघर्षमय प्रवासाची गाथा

या आत्मचरित्रामुळे वांग्मय प्रकारात मोलाची भर पडणार असून अनेक अधिकाऱ्यांच्या यशोगाथा असणाऱ्या पुस्तकापेक्षा हे वेगळे ठरते. डॉ.केळे यांच्या साहित्य संपदेतील 'जगी ऐसा बाप व्हावा' हे वडिलांचे चरित्र, 'नानी' हे आपल्या आईचे चरित्र आणि आता 'एडका' हे आत्मचरित्र. यामधून एक बाब प्रकर्षाने समोर आली ती म्हणजे, मराठी साहित्यामध्ये आपल्या आई-वडिलांचे चरित्र व स्वतःचे आत्मचरित्र लिहिणारे डॉ. मुरहरी केळे हे एकमेव लेखक आहेत, हे मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ.कौतिकराव ठाले पाटील यांचे उद्गार खरे ठरतात. 'एडका' हे आत्मचरित्र येणाऱ्या तरुण पिढीला प्रेरणा देणारे, नोकरी करणाऱ्यांना अन्यायाविरुद्ध संघर्षाची शिकवण देणारे आणि समाजाला एक बहुआयामी व्यक्तीमत्वाची ओळख करून देणारे आहे. घडत्या वयातील तरुणांनी हे आत्मचरित्र आवर्जून वाचावे संग्रही ठेवावे आणि त्यातील यशोगाथा समजून घ्याव्यात, संघर्षाचा आलेख समजून घ्यावा, डॉ. केळे यांच्या अविरत कष्टाचा, चिकाटीचा, यशाचा, ध्यासाचा मंत्र घेऊन भरारी घ्यावी. नैराश्याच्या खायीत बुडालेल्या तरुणांना आणि समाजाला ही आत्मचरित्र पुन्हा चैतन्य प्राप्त करून देईल अशी खात्री वाटते.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मतदान केंद्रावर पाळणा घर, प्रथमोपचार पेटी आणि व्हिल चेअर सुद्धा; जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा




छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ साठी मतदान केंद्रावर मतदारांना विविध सुविधा द्यावयाच्या आहेत. त्यात उन्हाळ्याच्या अनुषंगाने द्यावयाचे प्रथमोपचार पेटी, पाळणा घर व व्हिल चेअर या सुविधांचा समावेश आहे. या सुविधा मतदान केंद्रावर उपलब्ध करण्यासाठी महिला बालविकास, सामाजिक न्याय व आरोग्य विभाग यांनी समन्वय राखावा,असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

मतदान केंद्रांवर मतदारांना द्यावयाच्या सुविधांच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपोवळे महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.पारस मंडलेचा, जिल्हा महिला बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पांडुरंग वाबळे यांच्यासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता बैठकीस उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, मतदान केंद्रावर मतदारांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम आरोग्य, समाज कल्याण आणि महिला बालविकास विभागाने समन्वयाने करावे. उन्हाळ्याचा कालावधी असल्याने मतदारांना आरोग्य सुविधा,पाळणाघर आणि दिव्यांगांसाठी व्हील चेअर उपलब्ध द्याव्या. मतदानासाठी आलेल्या मतदारांना वैद्यकीय मदत, रुग्णवाहिका प्रथमोपचार पेटी, महिला मतदाराच्या मुलांसाठी पाळणाघर, दिव्यांग मतदारांसाठी व्हील चेअरची व्यवस्था करण्यात यावी, यासाठी तालुकानिहाय नियोजन करण्यात यावे,असे त्यांनी सांगितले.

डॉक्टर, आरोग्य सेवक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांच्यासह रुग्णवाहिका यांची २४ तास सुविधा उपलब्ध करून द्यावी. मतदान साहित्य वितरण करतांनाच प्रथमोपचार किट मतदान चमू सोबत द्यावयाचे आहे. त्यादृष्टीने नियोजन करावे. सर्व साहित्य व उन्हाळ्याच्या अनुषंगाने होणाऱ्या आजारांवर प्रथमोपचार म्हणून आवश्यक औषधी, इलेक्ट्रॉल सॅचेट इ. त्या किट मध्ये असावे. तसेच लहान बालक असणाऱ्या मातांना मतदान करता यावे म्हणून त्यांच्या बाळांसाठी पाळणाघर सज्ज करावे. तेथे अंगणवाडी सेविकांची नियुक्ती करावी. मतदान केंद्र हे सुसज्ज व सुविधांनी पूर्ण असावे जेणे करुन जास्तीत जास्त मतदारांना प्रोत्साहन मिळावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# सिटी चौक रस्त्यावरील ५३ अतिक्रमणे काढली



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- सिटी चौक रस्त्यावरील जवळपास ५३ अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. आज मनपा अतिक्रमण विभागामार्फत सिटी चौक ,कपडा बाजारच्या दुकानदारांनी रस्त्यावर बांधलेले ओटे तोडण्यात आले. सदरची कार्यवाही सकाळी १० वाजेपासून सुरू करण्यात आली होती. सर्व प्रथम अत्तर गल्लीत मिळकत धारकांनी सार्वजनिक गल्लीत बांधकाम करून गल्ली अरुंद केल्याने नगररचना विभागामार्फत मार्किंग सुरू करण्यात आली.परंतु तांत्रिक अडचणीमुळे मार्किंग होऊ शकली नाही. दिनांक ३० एप्रिल रोजी याच भागात अतिक्रमण कारवाई करण्यात आली होती.या कारवाई दरम्यान राहिलेल्या दुकानासमोरील ओटे पायऱ्या निष्काशीत करून पादचाऱ्यांना होणारी अडचण दूर करण्यात आली असून आज सुमारे ५३ दुकानांच्या पायऱ्या व ओटे निष्काशीत करण्यात आले आहे. तसेच शहागंज येथील ०४ हातगाड्यांवर कार्यवाही करून जप्त करण्यात येऊन इतर साहित्य देखील जप्त करण्यात आले.

तसेच सिटी चौक येथे फुल विक्रेते यांचे ०२ लोखंडी टेबल जप्त करण्यात आले. सदर कार्यवाही आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार मा. अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त सविता सोनवणे ,सहाय्यक आयुक्त झोन ०२ रमेश मोरे ,नगररचना विभागाचे अभियंता राहुल मालखेडे, इमारत निरीक्षक मोहम्मद मजहर अली, सागर श्रेष्ठ ,शिवम घोडके प्रदीप चौरे यांनी पार पाडली .सिटी चौक, गुलमंडी ,रंगार गल्ली हा परिसर अत्यंत वर्दळीचा असल्याने सामान्य लोकांना होणारा दररोजचा त्रास दूर होणे करिता मनपा प्रशासनाने सदरची कार्यवाही उद्या पण राबविण्याचा निर्णय घेतला असून दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर असलेले अतिक्रमण स्वतः काढून घ्यावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महावितरण प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात गुणवंत कर्मचाऱ्यांचा गौरव



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचा सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता व मुख्य अभियंता भुजंग खंदारे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शहर मंडलातील अमोल पगारे, देवेंद्र ढोले, सय्यद अकबर, वामन बनकर, चंद्रकांत कदम, उमेर सय्यद, येशुदास पाखरे, धनंजय वामणे, संजय बनकर, कृष्णा डमाळे, रवींद्र उमाप, ग्रामीण मंडलातील फकिरा पवार, विलास भुजबळ, नितीन बोडखे, अविनाश निकम, जितेंद्र हाडे, नंदकिशोर म्हस्के, दिनकर खामट, मुकीमखान पठाण, महेश कऱ्हाळे, दत्तात्रय वाघ, काकासाहेब औटे, कार्तिक पातारे, किशोर बोडखे, प्रशांत धनगरे, नवनाथ मांदडे, राकेश बारवकर, अमोल गायकवाड, अंकुश सहाणे, ज्ञानेश्वर घोडके तर जालना मंडलातील रामदास गिते, भगवान जगताप, कैलास वैष्णव, रमेश खरात, कृष्णा दिवे, गजानन जाधव, कृष्णा जाधव, सोमनाथ पाचफुले, संदीप गाडेकर. नीळकंठ सोळंके, संतोष पौळ या कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले.

यंदा प्रथमच वीजबिल वसुली कार्यक्षमतेसाठी प्रादेशिक कार्यालयातर्फे अभियंत्यांना सन्मानित करण्यात आले. यात मुख्य अभियंता भुजंग खंदारे (छत्रपती संभाजीनगर परिमंडल), अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी (शहर मंडल), अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव (नांदेड मंडल), कार्यकारी अभियंता प्रेमसिंग राजपूत (शहर-१ विभाग), कार्यकारी अभियंता महेश पाटील (शहर-२ विभाग), कार्यकारी अभियंता गणेश सामसे (लातूर विभाग), अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रवीण जोशी (वाळूज शहर उपविभाग), अतिरिक्त कार्यकारी अभियंता बळीराम सोनवणे (उदगीर शहर उपविभाग), अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनय घनबहादूर (पॉवर हाऊस उपविभाग), सहायक अभियंता विनायक पेनकर (उदगीर शहर-३ शाखा), कनिष्ठ अभियंता महेंद्र निकम पाटील (खालापुरी शाखा) यांना गुप्ता यांच्या हस्ते गौरवण्यात आले. अधीक्षक अभियंता मदन सांगळे (लातूर मंडल) यांच्या वतीने व्यवस्थापक संजय खाडे यांनी प्रमाणपत्र स्वीकारले. राज्य शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारप्राप्त कर्मचारी रमेश शिंदे यांचाही या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता म्हणाले की, पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांनी यापुढेही अधिक चांगले काम करावे आणि इतरांनीही त्यापासून प्रेरणा घ्यावी. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठीही उपाययोजना आखण्यात येतील. तसेच छत्रपती संभाजीनगरमध्ये कर्मचाऱ्यांसाठी हाऊसिंग सोसायटी उभारण्याचा मानस असल्याचे ते म्हणाले. मुख्य अभियंता खंदारे म्हणाले की, बहुतांश कर्मचारी स्वयंप्रेरणेने चांगले काम करतात. गतवर्षी झालेल्या उणीवा दूर करून आगामी वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.

कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मोहन काळोगे, शुभांगी कटकधोंड, बीना सावंत, प्रभारी महाव्यवस्थापक नितीन पाडसवान, प्रभारी उपमहाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे, प्रभारी सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी किशोरी तळेले, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, भूषण पहूरकर, रमेश वाघचौरे, प्रेरणा बनकर, शैलेश कलंत्री, सिद्धार्थ नायडू यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख लिपिक जयश्री कांबळे, फारूक शेख, सागर अग्रवाल, डॉ.कृष्णा काळदाते यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# वरद विद्या संकुलात महाराष्ट्र दिन साजरा

## सुंदर हस्ताक्षर व निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको एन-२ भागातील वरद विद्या मंदिरात महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते सुरूवातीला ध्वजारोहन व ध्वजवंदन झाले.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या स्वीप मतदान जनजागृतीच्या मोहिमे अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा व निबंध स्पर्धा देखील घेण्यात आली.या स्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना नोडल ऑफिसर तथा ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सीताराम पवार यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच या प्रसंगी सर्व वर्गाचे निकाल देखील जाहीर करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजारामजी अवचार, ज्येष्ठ नागरिक गणपतराव जगताप, चंद्रकांत रूपेकर, रामेश्वर पाटेकर, संस्थेचे अध्यक्ष रमेश अवचार, संस्थेच्या सचिव श्रीमती शीला कानकटाव, शाळेचे मुख्याध्यापक गणेश राऊत व सर्व शिक्षक वृंदांची उपस्थिती होती.

# कराड चिपळूण महामार्गावर गॅस टँकरचा अपघात, गॅस गळतीमुळे एकच गोंधळ



पाटण दि.२ (प्रतिनिधी)- साताऱ्यातील कराड चिपळूण राज्य महामार्गावर पाटण तालुक्यात गॅस टँकरला भीषण अपघात झाला आहे. या अपघातानंतर मोठ्या प्रमाणावर गॅस गळती सुरु झाली आहे. यामुळे परिसरातील लोकांना मोठ्या प्रमाणात त्रास होताना दिसत आहे. सध्या अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली असून गॅस गळतीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सुरु आहे.

गेल्या काही दिवसांपासून कराड-चिपळूण राज्य महामार्गावर अपघाताच्या घटना घडत असल्याचे दिसत आहेत. यामुळे अनेकजण रस्ते अपघाताचे बळी ठरताना दिसत आहेत. आता साताऱ्यातील कराड चिपळूण राज्य महामार्गावर पाटण तालुक्यात गॅस टँकरला भीषण अपघात झाला आहे. या अपघातानंतर हवेत धुराचे लोळ उठल्याचे दिसत आहे. सध्या अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली आहे. या अग्निशमन दलाच्या जवानांकडून गॅस गळतीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सुरु आहे.

कराड-चिपळूण राज्य महामार्गावर गॅस टँकरला अपघात झाल्यानंतर या टँकरमधून मोठ्या प्रमाणात गॅस गळती सुरु झाली आहे. या घटनेनंतर आजूबाजूच्या परिसरात गॅस गळतीचा त्रास होऊ लागला आहे. या गळतीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र यात नेमका कोणता गॅस आहे, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# शहरातील विविध भागात आज काही काळ वीज बंद

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- देखभाल व दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामासाठी शहरातील काही भागांत शुक्रवारी (३ मे) काही काळ वीजपुरवठा बंद राहील. सकाळी ८ ते १२ पर्यंत औरंगपुरा, समर्थनगर व सीपी ऑफिस फीडरवरील सर्व भाग, सकाळी १० ते २ वाजेपर्यंत मयूरनगर, एन-११, एन-१२, लुणार सोसायटी, सिद्धार्थनगर, जमनज्योती, फकीरवाडी, यासिननगर, हर्सूल गाव, जटवाडा रोड, चेतनानगर, जहांगीर कॉलनी, बेरीबाग, कोलठाणवाडी रोड, भगतसिंगनगर, हर्सूल ते पिसादेवी रोड, भीमटेकडी, बेघर योजना, होनाजीनगर, सारावैभव, सईदा कॉलनी, अंबरहिल ते एव्हरेस्ट कॉलेज परिसर, सकाळी १० ते २ वाजेपर्यंत प्रतापनगर, शहानूरवाडी, ज्योतीनगर, चौसरनगर, दर्गा परिसर, भीमगड, कासलीवाल रेसिडेन्सी, चाणक्यपुरी, शम्सनगर, देवानगरी, दशमेशविहार, काशय गार्डन, परदेशी टॉवर, झांबड कॉर्नर, विशान रेसिडेन्सी, तुळजाईनगर, इंदिरानगर, गादियानगर, शिवराज कॉलनी, केशवनगरी, देशपांडेपूरम, मयूरबन कॉलनी, रायनगर, सकाळी १० ते २ पर्यंत जालना रोड, अहिंसानगर, वेंकटेशनगर, रघुवीरनगर, सकाळी १० ते ४ पर्यंत सिडको एन-२, एन-३, एन-४, ठाकरेनगर, पारिजातनगर, स्पंदननगर, मुकुंदवाडी, जयभवानीनगर, तिरुपती कॉलनी, एसटी कॉलनी, पुंडलिकनगर, हनुमाननगर, विश्रांतीनगर, मायानगर, गजानननगर, सावित्रीनगर, रामनगर, म्हाडा, चिकलठाणा, एसटी वर्कशॉप, बीएसएनएल ऑफिस, कन्सेप्ट फार्मा, मेल्ट्रॉन, एन-१, टॉवर सेंटर, कॅनॉट, सिडको ऑफिस, एलआयसी ऑफिस, एन-५, एन-६, एन-७, एन-९, कौसर पार्क, गणपती मंदिर, मेहता डीपी, सिसोदीया, नारेगाव, गारखेडा परिसर, पन्नालालनगर, शिवाजीनगर, सकाळी १० ते १२ पर्यंत कांचनवाडी, नक्षत्रवाडी, दुपारी ३ ते ४ पर्यंत देवळाई परिसरातील आभूषण पार्क, भक्त प्रल्हाद, विजयंतनगर, श्रीविहार कॉलनी, अरुणोदय कॉलनी, दत्त मंदिर, हरिराम नगर, बंबाटनगर, राजेशनगर, कौसर पार्क या भागात वीजपुरवठा बंद राहील. वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

(पान १ वरुन)

## उद्धव ठाकरेंकडे शिव्या आणि टोमणे...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. नाशिक तसेच दिडोरी लोकसभा मतदारसंघातून आज महायुतीच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

निवडणुका आल्या की तयारी करायची, असे महायुतीचे काम नाही. आम्ही २४ तास आमचे काम करत असता. त्यामुळे आम्ही फक्त निवडणुकीपुरते काम करत नाही, आम्ही घरी बसून काम करत नाही. आम्ही फेसबुक लाईव्ह करत बसत नाही. आमचे काम २४ तास चालू असते. त्यामुळे २४ तास काम करणारे कार्यकर्ते आमच्या सोबत आहेत. हेमंत गोडसे यांची उमेदवारी जाहीर करायला उशीर झाला, असला तरी देखील आमचा विजय पक्का असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

## हेमंत गोडसे, डॉ.भारती पवारांनी...

महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

नाशिक शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे आणि दिंडोरीच्या भाजपच्या उमेदवार डॉ. भारती पवार हे हायुतीचे दोन्ही उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी होणार आहेत. महायुतीचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आज भर उन्हात इथे मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. यावरून लक्षात येते की, नाशिक आणि दिंडोरीत दोघेही उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी होण्याचा निर्धार नाशिककरांनी केला आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे.

## मतदानाची टक्केवारी अचानक कशी वाढली?,....

आहे, असे राऊत म्हणाले.

तसेच पुढे राऊत म्हणाले, भारताच्या निवडणूक आयोगावर किती विश्वास ठेवायचा, हा एक गंभीर विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या दबावाखाली निवडणूक यंत्रणा काम करत आहे. कुठलीतरी अदृश्य शक्ती निवडणूक आयोगावर दबाव टाकतेय. निवडणूक आयोगांने माती खाल्ली आहे. देशभरात अनेक ठिकाणी अशाच पद्धतीने मतदानाच्या टक्क्यात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वाढलेले मतदान कोणी केले?, हे खूप धक्कादायक आहे. मतदानाची टक्केवारी जाहीर करायला ११ दिवस का लागले?, हे डिजीटल इंडिया आहे, असा घणाघात संजय राऊतांनी केला.

## शरद पवारांना मी कधी सोडले नाही,...

वेगळा निर्णय घेऊन सन १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. जो परकीय मुद्दा काढला तो नंतर बाजूला ठेऊन ते पुन्हा काँग्रेस सोबत जावयाचे म्हणाले. अनेकवेळा आम्ही साथ दिली व कुठे अंतर ठेवले नाही. नंतरच्या काळात परिस्थिती बदली काँग्रेस सोबत सरकार बनवले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिक सदस्य निवडून आले त्यावेळी विलासराव देशमुख मला म्हणाले, तुमचा कोण मुख्यमंत्री बनणार. पण साहेबांनी आदेश दिला की, काँग्रेसचा मुख्यमंत्री केला पाहिजे आपण चार मंत्रीपद जास्त घेऊ. आता जे केले ते सन २००४ साली केले पाहिजे होते असे मला वाटत आहे.भाजपला २०१४ मध्ये बाहेरुन पाठिंबा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दिल्याचे सांगण्यात आले. त्याचे समर्थन सांगण्या आले की, ही राजकीय खेळी असून आम्हाला सर्वांना साहेबांनी वानखेडे स्टेडियमला शपथविधीला पाठवले. नंतर साहेब म्हणाले, थोडया दिवसाने आपल्याला सरकार मध्ये सामील व्हायचे आहे. पुढील निवडणुकीत २०१७ मध्ये साहेब म्हणाले शिवसेना मला चालत नाही तो खूप जातीवादी पक्ष आहे. २०१९ साली दिल्लीत देवेंद्र फडणवीस व अमित शाह यांच्यासोबत चर्चा होऊन सर्व मंत्रीपदे ठरवली गेली. त्यावेळी शाह मला म्हणाले, चर्चा एक होते व नंतर दुसरेच घडते. पूर्वीचा अनुभव आम्हाला चांगला नाही. मी त्यांना सांगितले मी शब्दाचा पक्का असून ठरल्याप्रमाणे वागेल. परंतु मुंबईत आल्यावर साहेब म्हणाले, शिवसेने सोबत आपल्याला आता जावयाचे आहे. सदर सरकार करताना, काँग्रेस नेते मल्लीकार्जुन खरगे यांच्यासोबत साहेबांचे एका बैठकीत वाद झाले. त्यानंतर साहेब आम्हाला म्हणाले, तुम्हाला काय करायचे ते करा. त्यांची संमती घेऊन वर्षावर जाऊन चर्चा केली. जयंत पाटील यांना देखील याबाबत माहिती आहे.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३३१२८८**
ई-मेल westaurangabad.ee@mahapwd.gov.in वेब साईट www.mahawd.gov.in

**ई-निविदा सुचना क्रं. ०३ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सक्षम वर्गातील कंत्राटदार यांच्याकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. (एकुण ०१)

अ) http://mahapwd.
ब) https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

संमा/छत्रपती संभाजीनगर/जाहिरात/०२/२०२४-२५